सात दिवस कॉलेजच्या संस्काराचे

(एन.एस.एस. शिबिर)

- स्वप्नील कारळे आणि रवि शर्मा

साहित्य प्रतिष्ठान

पुस्तकाचे नांव : सात दिवस कॉलेजच्या संस्काराचे

प्रकार : कॉलेज एन.एस.एस.शिबिराचे वर्णन

लेखक : स्वप्नील कारळे आणि रवि शर्मा

: ईमेल : yuvabharat022@gmail.com

८४४६४४०७५४, ९३२२३३५३४२

फोटो ग्राफर : साईनाथ चिल्का

मुखपृष्ठ : स्वप्नील कारळे

प्रकाशन : ई साहित्य प्रतिष्ठान

आपले वाचुन झाल्यावर अनेकांना हस्तांतरीत करु शकता. या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असुन पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण किंवा नाटक, सिनेमा, सिरियल, स्टेज शो किंवा तत्सम रुपांतर किंवा भाषांतर करण्यासाठी परवानगी घेणे आवश्यक आहे.

अर्पणपत्रिका

चांगले संस्कार आपल्या सवई ठरवतात. चांगली सवय आपले काम योग्य वेळेत करुन देते. तर योग्य वेळेत झालेले काम आपल्याला यश मिळुन देते. जो आपल्या संस्कारांचा मदतीने आपल्या सवयींवर शासन करु शकतो तो व्यक्ती जगातला एक उत्तम शासक असतो.

उदा. अभ्यास

- रवि शर्मा और स्वप्नील कारले

तरुण विचार,
तरुण भारत.

माझ्या ई - मित्रांनो नमस्कार,

सर्व व्यापक असा माहितीतंत्राचा वापर करुन आपण जास्तीत जास्त लोकांपर्यंत आपले विचार नेणे हा आमच्या उद्देश आहे. आम्ही भिवंडी येथील बी.एन.एन कॉलेजमधील विद्यार्थी असून आम्ही आमचा एन.एस.एस कॅम्पमधील झालेला अनुभव आम्ही तुमच्या समोर ठेवत आहोत. कॅम्पमधील अनुभव हा आमच्यासाठी व्यक्तीमत्व विकासाचा केंद्र ठरला. तेथे भेटलेले गुण जणू आम्हाला एक नवीन ओळख देण्यासारखे होते. मित्रांनो कॅम्प किंवा शिबिर हा शब्द ऐकताच कितेकांना हा एक बोरींग असी संकल्पना वाटते पण या शिबिराचे हेच वेगळेपण आहे की यात आम्हाला एक नवा हसता-खेळत्या कॅम्पची ओळख झाली. ज्यात खुप मस्ती, सामाजिक प्रश्नांची जाण आणि शिस्त यांचे एक मिश्रन करुन दिले होते.

सदर कथेतुन आम्ही कॉलेज जीवनातील झालेल्या त्या सात दिवसांच्या संस्काराचे वर्णन केले आहे.

प्रस्तावना

तो दिवस ज्या दिवशी मी नेहमीप्रमाणे माझ्या मित्रांबरोबर कॉलेजच्या आवारात फिरत होतो. आम्ही वर्गापेक्षा वर्गाबाहेरच जास्त दिसायचो. कॉलेज सुरु होऊन दिड महिन्याचा काळ उलटला होता. तसे हे सिनियर कॉलेजचे दुसरे वर्ष होते. कॉलेज हे आमच्यासाठी सकाळची वेळ घालवण्याचे आणि टाईमपास करण्याचे उत्तम साधन होते. त्यात आमची ही काही चुक नव्हती सकाळच्या बोरींग व्याख्यानापासुन दुर जाण्याचा आमचा एक छोटासा प्रयत्नच होता.

त्या दिवशी नेहमीप्रमाणे कॉलेजमध्ये फिरत असतांना आम्हाला एका अर्जाबद्दल कळाले. तो अर्ज हा एन.एस.एस. म्हणजे **राष्ट्रीय सेवा योजना** यात प्रवेश घेण्याचा होता. सुरुवातीला आम्हाला मित्रांकडुन फक्त एवढेच कळाले की त्यातुन आम्हाला परिक्षेचे दहा मार्क मिळतील.पण प्रत्यक्षात अर्ज घेतांना राष्ट्रीय सेवा योजना म्हणजे नेमके काय याचा अनुभव झाला.

मी आणि माझा मित्र एन.एस.एस. कार्यालयात पोहोचलो.तेथे आत एक विद्यार्थी अर्ज वितरण करत होता. तशी तिथे गर्दी फारच कमी होती.

आम्ही समोर बसलेल्या एका विद्यार्थ्याला प्रश्न विचारला.

"अरे एन.एन.एस म्हणजे काय ?"

तो अडखळत उत्तर देत म्हणाला

"एन.एस.एस ही एक प्रकारची सेवा असते. आपण यात २ वर्ष एकत्र मिळुन काम करतो ज्यात आपण स्वच्छता, वृक्षारोपन आणि यासारखे अनेक उपक्रम वर्षाभरात वेगवेगळ्या ठिकाणी राबवत असतो आणि यात एकदा सात दिवसांचा शिबीर ही असते"

मी काही बोलणार तेवढ्यात माझा मित्र रवि यांने दोन फार्म घेऊन तयार होता. मी ही त्याला पांठीबा देत म्हणालो

"चल फार्म भर ही डालते है।"

कदाचित हाच आमचा योग्य निणर्य आम्हाला भविष्यात एका चांगला व मनोरंजक अशा व्यासपीठाची ओळख करुन देणार होता. अर्जाची स्वीकृती होताच आम्ही एन.एन.एस च्या अनेक कार्यक्रमात सहभागी झालो. त्यात कधी वीज बचत, आपत्ती व्यवस्थापन, रक्तदान शिबीर, एच.आय. व्ही. जागृती सारख्या अनेक कार्यक्रमात सहभागी झालो. आम्ही समाजाल जागृत करणाऱ्या अशा कितेक विषयांना रॅलीत सहभागी होऊन लोकापर्यंत आमचे आव्हाने नेली.

हे सर्व करत असतांना आम्हाला समाजाबद्दल आमची जबाबदारीची जाणीव झाली. समाजाला ओळखून आम्ही समाजातील एक घटक राहतांना समाजाला एक जागृत करण्यारा घटक कधी बनलो हे कळलेच नाही. मित्रा मधला जातीवाद आम्ही तर कधीचा विसरलो होतो. आता वेळ होती एका सात दिवसांचा शिबिराची ज्यात आम्हा सर्व स्वयंमसेवकांना जाणे बंधनकारक होते. आमच्या सात दिवसांचा शिबिर बी.एन.एन. कॉलेज भिवंडीमधुन परळी आश्रम शाळा, परळी. ता. वाडा येथे ठेवण्यात आला. दि.२४ डिसेंबर २०१३ कॅम्पच्या तयारीसाठी एक एन.एन.एस. सभा ठेवण्यात आली होती. ज्यात आम्हाला शिबिराबद्दल माहिती व त्यासाठी लागणाऱ्या साहित्यांची लीस्ट मिळणार होती. भेटलेली माहिती घेऊन सर्वच विद्यार्थी कॅम्पच्या तयारीला लागले. उत्सुकता शिगेला पोहचली. शिबिराला जाण्याचा दिवस उद्यावर येऊन ठेपला होता. आज आम्हाला सर्व सामान बॅंगेत भरुन ठेवायचे होते. तीन गणवेश ज्यात एक एन.एस.एस. च्या गणवेश होता. जेवण्याचे साहित्य आणि इतर गरजेच्या वस्तु ज्यामध्ये मोबाईलचाही सहभाग होतो अशा सर्व वस्तुंना बॅंगेत भरुन आम्ही तयार होतो. दुसऱ्या दिवशी बस स्टॅन्ड पासुन कॅंम्पच्या एका मनोरंजक पण सामाजिक जाणीव असणाऱ्या प्रवासाला निघणार होतो.

पहिला दिवस २४/१२/२०१३

सकाळी ५ च्या सुमारास उठल्यानंतर मी कॅम्पच्या तयारीला लागलो. दात घासुन झाल्यावर लगेचच अंघोळ करुन मी तयार झालो. बँग भरुन मी आणि माझ्या मित्र बस स्टॅन्डच्या दिशेने निघालो. बस स्टॅन्डपर्यंत लवकर पोहचण्यात वडीलांच्या दुचाकी वाहनाची भुमिका होती. स्टॅन्डवर पोहचताच ओळखीचा चेहरे आमच्याकडे हातवारे करत होते. अजुनही भरपुर मंडळी बस स्टॅन्डवर पोहचली नव्हती. आमची एक वेगळी बस स्टॅन्डच्या एका कोपऱ्यात उभी होती. सगळ्यांच्या उपस्थितीनंतर आमची बस निघाली. बस मध्ये तोच विद्यार्थ्यांचा आरडा-ओरडा तर सरांची मात्र मोजमापणी चालु होती.

थोड्या वेळानंतर विद्यार्थ्यांचा आरडा-ओरडेत आम्ही ही सहभागी झालो. काहीजण शायरी बोलुन तर कोणी गाण्याने सगळ्यांचे लक्ष आपल्याकडे वेधुन घेत होते. भिवंडी ते परळीच्या सफर नुकताच सुरु झाला होता. तर रस्ताने पुढे जातांना विद्यार्थ्यांचा संख्येत सतत वाढ होत होती. हे सागण्यांचे प्रयोजन तसे नाही पण चांगल्या विनोदापेक्षा विद्यार्थी वाईट विनोदांवर काही जास्तच लक्ष देत होते.

तसा आम्हाला पोहचण्यासाठी दीड तास लागणार होता पण जास्त ट्राफीक मुळे काही जास्त वेळ लागला. पण मित्रांचा मनोरंजक सफरमध्ये हा वेळ कधी निघुन गेला हे कळलेच नाही.

प्रवास पुर्ण झाला. भरपुर झाडे-झुडपांना मागे टाकत आम्ही एक गावांत पोहोचलो. गांव शहरापासुन तसे खुपच दुर होते. गावांत भौतिक वस्तुची कमतरता दिसत होती. तर आमच्या मोबाईल रेंज मागेच हरवली होती. गावात आमच्या बस थांबण्यांचे ठिकाण हे बरोबर परळी आश्रम शाळेचा गेटपासी होते. आमच्या समोर एक आश्रमशाळा होती. त्यावेळी दुपारचे बारा वाजले होते.

दुर्लक्षित आणि मुख्य शहरापासुन लांब ही अशी परळी आश्रम शाळेत आमचे सात दिवस जाणार होते. सुरुवातीचे काही वेळ आम्हाला तेथे फार बोरींग असा स्थितीत घालवावा लागला. दुपारी एक सुमाऱ्यास आम्ही सर्व एकत्र सावलीत बसुन जेवलो. जेवणानंतर आम्हाला थोड्यावेळ आरामानंतर आम्ही सर्वजण मैदानात जमलो. पाच रांगेचा स्थितीत आम्ही सर्वजण विभागलो गेलो. नंतर आमच्या एन.एन.एस. चे माजी विद्यार्थ्यांनी नेतृत्त्व हाती घेतले. त्यांनी आम्हाला येता सात दिवसात करण्यात येणाऱ्या कामांची थोडक्यात माहिती सांगितली आणि आम्हाला सात गटात विभागून प्रत्येक गटाला त्यांची जबाबदारी सांगितली.सात दिवसाचे जेवण सात ग्रुप दिलेल्या दिवसाप्रमाणे बनवतील. दिलेली दिनचर्या ही पुढीलप्रमाणे होती. सकाळी पाच च्या सुमारास उठणे. नंतर दात घासुन व तोंड धुऊन तयार राहणे. मग वार्मआऊट (कसरत) करणे. त्यानंतर प्रभातफेरी, मग हाथ पाय धुऊन नाश्ता करुन घेणे. त्यानंतर श्रमदानाचे ३ ते ४ तास वृक्षारोपन, साफ-सफाई तसेच कृंपन लावणे असे विविधप्रकारचे श्रमदानाची कामे करणे. श्रमदानाची कामे झाल्यावर नदीवर जाऊन अंघोळ करुन घेणे. त्यानंतर दुपारचे जेवण आणि मार्गदर्शन व संस्कारसाठी एक व्याख्यांन आणि सध्याकाळची वेळ ही एका मनोरंजक कार्यक्रमासाठी होती.

दिनचर्येप्रमाणे तर आता व्याख्यान होते पण पहिला दिवस आम्हाला सर्वकाही समजण्यासाठी दिला होता. आपला ग्रुपला ओळखणे, सकाळची सर्व प्रार्थना व राष्ट्रगीत पाठ करणे असा कृतीत दुपारची वेळ गेली. खरी शिबीरची सुरुवात तर उद्यापासुन होणार होती. उद्यापासुन आम्हाला दिलेला दिनचर्येप्रमाणे आपले काम करायचे होते. पहिला दिवसापासुन मला कळले की समाजाला ओळखणे किती महत्त्वाचे आहे आज दुर त्या मोबाईल दुनिया पासुन आम्ही एक आस्तित्वात असलेला दुनियेत होतो. खरच सगळ्या सुख सुविधापासुन दुर असणारे लोकांचा बाबतीत किती दुर्लक्ष झाले आहे हे तिथे आल्यावर समजले.

★★★

दुसरा दिवस २५/१२/२०१३

दुसऱ्या दिवशी आम्ही ५ च्या सुमऱ्यास उठलो. प्रत्येकाने आपल्या सुरुवात दात घासणे आणि शौचालयाला जाणे यापासुन सुरुवात केली. त्यानंतर आम्ही मैदानात जमलो. मैदानात वार्मआऊट करत असतांना नविन नविन प्रकारचे व्यायाम बघायला भेटत होते. व्यायाम झाल्यानंतर आम्ही प्रभातफेरीत सहभागी झालो. त्यात आम्ही वेगवेगळ्या प्रकारचे नारे आणि गीत गाऊन लोकांना जागृती करण्याचे काम करत होतो. हम होंगे कामयाब हम होंगे कामयाब हे गीत तर गाऊन, तर नारे बोलुन प्रभातफेरी संबोधित करायचो.

पण विद्यार्थ्यांनी प्रत्येक गोष्टीत काही मनोरंजक कामे करायची सवय असते. सरांचा नावाला एका श्लोकांशी जोडण्यात त्यांना एक वेगळाच आनंद भेटायचा. प्रभातफेरी नंतर आम्ही परत एकदा आश्रम शाळेत आलो. नाश्ता तयार होता. नाश्ता करुन झाल्यावर प्लेट धुऊन त्याला बॅंगेत ठेऊन आम्ही परत एकदा मैदानात जमलो. आता वेळ होती श्रमदानाची प्रत्येक संघाला काम विभागुन दिले होते. काही ग्रुपला आश्रम शाळेचा पुढचा भाग तर काहींना आश्रम शाळेच्या मागच्या भाग देण्यात आला होता. श्रमदान करण्याची एक वेगळीच मजा होती. पण काही वेळ साफ सफाई झाल्यांवर विद्यार्थी फोटो, शुटींग करायची. खरच काहीतर फक्त फोटोसाठी कॅम्पमध्ये आले आहेत असे वाटायचे.

श्रमदान हे देशांअंतर्गत किती महत्त्वाचे आहे. जर प्रत्येक भारतीयाने श्रमदान केले तर भारत हा स्वच्छ व निर्मल असेल. अंघोळ करण्यसाठी आम्हाला नदीवर जावे लागत होते. नदीत पाणी खुपच कमी होते. तरीही विद्यार्थी पाण्यात पोहण्याचा आनंद घेत होते.आम्ही ही त्यात सहभागी झालो. खुप वेळ पाण्यात घालवल्यानंतर आता परत जाण्याची वेळ पुर्ण झाली होती. आश्रमशाळेत पोहचल्यावर आम्ही सर्वजणे एकत्र जेवायला बसलो. जेवणाचा विषय हा आमच्यासाठी वेगळ्याच होता कारण आमच्या पैकी एका ग्रुपने हे जेवण बनवले होते. म्हणजे आमच्या मधल्याच विद्यार्थ्यांनी तयार केलेले जेवण आम्ही जेवत होतो.

जेवण झाल्यानंतर आम्ही थोड्या विश्रांतीनंतर व्याख्यानाला बसलो. व्याख्यानांत आज रसाळे सर आणि गावांतील प्रमुख व शाळेतील लहान मंडळी आली होती. रसाळे सरांचा आणि गावांतील विद्यार्थ्यांचा सत्कार एन.एन.एस. पद्धतीने म्हणजे एन.एन.एस. टाळीच्या सुरात झाला. व्याख्यानाला सुरुवात झाली. व्याख्यानाचा विषय हा एन.एन.एस. स्थापना आणि त्याची सामाजिक गरज हा होता. रसाळे सरांनी त्यांचा अनुभव आमचा समोर व्यक्त केला. त्यांचा वेळी एन.एन.एस. ची स्थिती व त्यातील बदल यातील फरक सांगण्यात व एन.एन.एस ची राष्ट्रीय स्तरावरील गरज आम्हाला त्यांचा व्याख्यांनातुन समजली. उत्तराखंडातील आपत्ती मध्ये किती मदत होऊ शकते याचे उदाहरण त्यांनी आम्हाला दिले. व्याख्यांनातील मुद्दे एन.एन.एस. च्या वृद्धीसाठी होते. खरच एन.एन.एस पासुन देशाला एका आपत्ती मधुन बाहेर येण्यासाठी मदत होऊ शकते. व्याख्यानाचा समाप्ती नंतरचा वेळ विश्रांतीसाठी होता. आम्ही तो वेळ वैयक्तीक स्वरुपात न घालवता त्या वेळेत काही खेळ खेळायचो.

खेळतांना लहानपणीचे सर्व खेळ खेळणे आमच्यासाठी एक वेगळा अनुभव होता. खेळण्यात पकडापकडी, खो-खो, कबड्डी व क्रिकेट असा खेळांचा समावेश होता. खेळण्यात कधी आठ वाजायचे हे कळायचे नाही. आठ सुमाऱ्यास आम्ही रात्रीचे जेवण करायचो. जेवण झाल्यानंतर फक्त एक महत्त्वाचा मनोरजंक असा कार्यक्रम बाकी आहे तो म्हणजे स्टेज सादरीकरण. प्रत्येक ग्रुपला एक नाटक सगळ्यासमोर सादर करावे लागत होते. या गोष्टीमुळे आम्हाला व्यासपीठावर बोलण्याचे साहस आमच्या मनामध्ये निर्माण झाले.

★★★

तिसरा दिवस २६/१२/२०१३

तिसऱ्या दिवशी नेहमी प्रमाणे आम्ही पहाटे उठलो आणि व्यायाम केला. प्रभातफेरी आणि त्यानंतर नाश्ता झाला. तिसऱ्या दिवसाचे वेगळेपण हे श्रमदानात होते. आज आमचा संघाला आश्रमशाळेचा पाठीमागे कुंपन बनवुन लावण्याचे काम दिले होते. तसेच कुंपन कसे बनवायचे याचे मार्गदर्शन सरांपासुन मिळताच. आम्ही आमच्या कामाला लागलो. ग्रुप चा मुख्य विद्यार्थ्यांनी दोन विद्यार्थ्यांना नदीवरची झाडे तोडुन आणण्यास सांगितले. या कामासाठी माझी आणि साईनाथ चिल्का याची निवड झाली. आम्ही साहित्य घेऊन नदीवर झाड्यांचा फाद्यां तोडण्यासाठी गेलो. फांदांना तोडतांना साईनाथच्या हाथाला जखम झाली तरीही त्यांचा उत्साह मोठ्या प्रमाणात होता. खरच कामाची आवड एवढी पहिले कधीही झाली नव्हती. आश्रमाच्या स्वच्छतेमध्ये लागलेली आमची मंडळी खरच एक श्रमदानातुन एक उत्तम सामाजिक जाणीव असल्याचा संदेश तेथील गावातील लोकांना देत होते. कदाचित आमच्या संदेशातुनच त्यांना आमच्या मदत करण्याची इच्छा जागृत झाली. त्यांनी आम्हाला झाडे तोडण्यात मदत केली.

काही फांद्यांना तोडल्यानंतर आम्ही त्यांना बांधुन परत आश्रम शाळेचा मागचा बाजुस आलो. फांदाच्या मदतीने एक मजबुत कुंपन आश्रम शाळेचा भोवती बनवायला सुरुवात केली. कुंपन बनवतांना भरपुर मुलांचा हातांना खरचटले किंवा लागले होते. तरीही त्यांनी ते काम पुर्ण केले. खरच सामुहिक रित्या काम केल्याने त्यात सामजिक दृष्टीकोन असतो. तिसऱ्या दिवसाचे श्रमदान पुर्ण झाले. श्रमदानाने आमचे कपडे खुप मळले होते. दिनचर्येप्रमाणे आम्हाला आता नदीवर अंघोळीला जायचे होते. आम्ही संगळ्यांनी टॉवेल, साबण आणि इतर वस्तु सोबत घेतल्या आणि नदीच्या दिशेने निघालो. साईनाथ नदीवरचे फोटो काढण्यासाठी कॅमरादेखील आणला होता.

अंघोळ करतांना विद्यार्थ्यांनी पोहण्याचा खुप आनंद घेतला. आम्ही सर्व नदीपात्रात उतरुन एकमेकांशी खुप मस्ती करत होतो. अघोळ झाल्यांनतर असे वाटले की तिथे बॉडी बिल्डरची स्पर्धा चालु आहे. प्रत्येक जण त्यात शर्ट काढुन शरीर दाखवत होते. त्यात आम्ही सहभागी नाही झालो याचे कारण तुम्हाला आमचे फोटो पाहुन आले असेल. अंघोळीचा वेळ संपला होता. दुपारचे दिड वाजले होते. श्रमदानाची थकावट अजुन आमच्या चेहरावर दिसत होती. जेवणाच्या अस्वाद घेतांना समोरचा व्यक्तीशी प्रेम वाढतच गेले. काही विद्यार्थी तर एका ताट्यात जेवत होते. खर एन.एन.एस ने आम्हाला बांधुन ठेवले होते. आम्ही भिवंडी सारख्या ठिकाणी जेथे मोठमोठ्या दंगली झाल्या.

तेथे अशा प्रकारची भावना बघतांना आनंद होत होता. कदाचित एन.एन.एस मुळे आमच्या सर्वांमधील जातीवाद कमी झाला. तेथे १० टक्के मुस्लिम स्वयंमसेवक असुन त्याच्या कुठलेही मतभेद नव्हते. त्यांचा नमाजाच्या वेळ त्यांना दिली होती. दुपारचे २.५० सुमाऱ्यास व्याख्यान होते. आज आमच्या कॉलेज चे उपप्राचार्य फपाळे सर येणार होते.

त्यांचा विषय हा पर्यावरणासंबंधी होता.आम्ही तर त्यांना फक्त कॉलेजमध्ये पाहिले होते. पण त्यांचा वेगळ्या स्वरुपातील व्यक्तीला आम्ही कॅम्पमध्ये अनुभवले.

खरच त्यांचा पर्यावरणावरील प्रेम आणि त्यासाठी गायलेली ती एक कविता भरपुर सुंदर होती.

त्याचे काही बोल मला आठवतात

"मन माझे मोहुन गेले...

मन माझे मोहुन गेले...

फुल दगडा आड दडाळे, फुल दगडा आड दडाले..."

त्यांनी दिलेल्या मातीतील सुक्षमजीवांनबद्दल सांगितले.

५ च्या सुमारास व्याखान संपले. आम्ही सर्व मित्र चहा पिण्याचा अस्वाद घेत होतो. संध्याकाळी आपण कोणते नाटक सादर करायचे. या विषयी चर्चा रंगत होती. कोणी म्हणाला आंध्रश्रद्धावर तर कोणी स्त्रिभुण हत्या याचावर आमचा चर्चा चालु होती. इतर ही ग्रुप आपल्या आपल्या सादरीकरण्याचा विषय शोधत होते.

आमच्या ग्रुपमधुन एक म्हणाला "आपण ना.. आंधश्रद्धावर नाटक करुया"

त्यात सगळेच संमती देत म्हणाले पण त्यात करणार काय ?

त्यातुन एक उर्मिला नावाचा मुलीने माझ्याकडे बोट दाखवले. सर्वजण माझ्या कडे पाहत होते. ती पुढे म्हणाली "स्वप्नील आपण ते नाटक करुया जे तु कॉलेजच्या गॅदरिंगमध्ये केले होते."

मी ही उशीर न करता विषय समजावुन सांगु लागलो. माझी स्क्रिप्ट तर तयार होती. संगळ्यांना त्यांचा पात्र दिल्यावर आम्ही वेगळे झालो. ते नाटक संध्याकाळी होणार होते. आता वेळ होती जरा मजा करायची म्हणजे खेळायची एन.एन.एस ची सर्व मुले एकत्र येऊन सोनसाखळी, धोबा-धोबी खेळून एकदुसऱ्यांना खुप पळवायचो. पाचवी सहावीचे खेळ कॉलेज दिवसांत खेळायचा एक वेगळ्याच आनंद असतो.

तिकडे प्रकाश आणि आमची शरीर हळु - हळु थकत होते. अंधार पडला. साडे आठ च्या सुमारास जेवण केल्यानंतर लगेचच आम्ही आमच्या नाटकाचा अभ्यासाला लागलो. सर्व ग्रुप आश्रम शाळेचा वेगवेगळ्या कोपऱ्यात रियसल करत होते. नाटक सादरीकरणाचा उद्देश हा प्रत्येकाचा मनातुन व्यासपीठाची भीती काढुन टाकनाचा होता. जे नाटक श्रेष्ठ त्याला योग्य प्रथम दर्जा देण्यात येणार होता.

रात्रीचे साडेनऊ वाजले. आम्ही सर्वजण मैदानात हलक्या प्रकाशात तयार होता. एक झाडाखाली आमच्या नाटक सादरीकरणाची व्यवस्था करण्यात आली होती. तिथे काही लाईटींग ही लावण्यात आली होती. आमचा कार्यक्रम बघण्यासाठी काही गावातील मंडळीही आली होती. आमचा ग्रुपचा पाचवा नंबर असल्याने आमचा प्रयोग शेवटीच होता. पहिला ग्रुपने नाटकाला उत्तम उर्दु गाण्याची जोड देत पुर्ण केले. साफसफाई च्या उद्दीष्टाने त्यांचा प्रयोग होता. दुसऱ्या ग्रुपने एक आत्मघाती नगरसेवक व जनता यांचातील संपर्क दाखवला तर त्याला बळी पडु नका अशा संदेश हि दिला. तिसऱ्या ग्रुपने रोड आपघात, चौथ्याने स्त्री-भुण हत्या विषयांवर हात घातला. तर आमचा पाचव्या ग्रुपने आंधश्रद्धासारखा विषय हाती घेतला.

ज्यात आम्ही लोकापर्यंत एक आधंश्रद्धित मुलांची गोष्ट सांगितले. सहाव्या ग्रुपमध्ये तर भयंकर लोग होते. त्यांनी कोणत्याही डायलोग न बोलता आपले सादरीकरण केले. त्यात त्यांनी मुलगा आणि मुलगीं यांची प्रेमसंबंध आणि सुटका याविषयी सांगितले. प्रत्येक नाटकात लोकापर्यंत एक संदेश जात होता आणि त्याबरोबर मुलांची व्यासपीठांची भीतीदेखील कमी होत होती.

★★★

चौथा दिवस २७/१२/२०१३

आजही दररोजप्रमाणे सकाळी फ्रेश होणे व व्यायाम करणे अशा कृती झाल्या. आजच्या व्यायाम हा फपाळे गरुजींचा हातात होता. मुलांना कितीप्रकारची आसने शिकवतांना मुलांची तारांबळ उडत होती. जिम शिवाय कधी काय केले असेल तर ना ?

सराचा आसन प्रेम आम्हाल सकाळच्या सुमाऱ्यास बघायला भेटले. त्यानंतर प्रभातरफेरी आज प्रभातफेरीत उप प्राचार्य आहे याचा फायदा काही मुलांनी नक्कीच घेतला.

मुलांचे नारे अशा प्रकारे होते ‘‘हमारा नेता कैसा हो फपाळे सर जैसा हो’’ खरच मुलांची मजा कशात असेल हे सांगता येत नाही. प्रभातफेरी तेथील लोकांना आमच्या कॅम्पची ओळख करुन देण्यासाठी होते.

सगळे परत एकदा आश्रमशाळेत पोहचले. नाश्ता हा तयारच होता. नाश्ता करुन आम्ही परत एकदा श्रमदानाला लागलो. आज आमच्या ग्रुपला मैदानातील एक कोपऱ्यातील घाण साफ करुन तेथे इटाचे कुंपन घालायचे काम दिले. हे काम करत असतांना तेथे हजार पेक्षा जास्त इटाचे तुकडे होते. पुर्ण इटाची खाणच होती. त्यासाठी आमच्यापाशी सात स्वयंसेवक होते. काम सुरु झाले त्यासाठी आम्ही प्रत्येकाल विशिष्ट अंतरावर ठेऊन इटा हस्थातरीत केला. ज्याने आमचे काम लवकर होने अपेक्षित होते.

चांगल्या इटांचा मदतीने तिथे झाडा भोवती एक कुंपन घातले. आमचे काम पुर्ण होताच ग्रुपलिडरच्या मदतीने आम्ही विभागलो गेलो आणि दुसऱ्या ग्रुपच्या मदतीला सुरुवात केली.

आजचा दिवशी आम्हाला व्याख्यानासाठी इंग्रजीचे कमालीचे विद्वान मालवणकर सर आणि व्यवस्थापन चे महत्त्व सांगण्यासाठी डॉ.वाघ सर येणार होते. यांचीही ओळख फक्त कॉलेजमध्ये झाली. दिनचर्येप्रमाणे श्रमदानंतर अंघोळ झाली त्यानंतर जेवणही झाले. जेवण्याचा स्वरुप आजकाल बदलेले होते. आम्ही ग्रुप शिवाय जेवणे अशक्य झाला सारखेच होते.

आता वेळ होती व्याख्यांनाची सांगितल्या प्रमाणे दोन्ही सर व्याख्यांनासाठी आले. मालवणकरांनी वाचन या क्षेत्रात भर दिला तर डॉ. वाघ सरांनी नियोजनाबद्दल सांगितले.

मालवणकर सर म्हणाले आपण कॉलेजच्या पुस्तका व्यतीरिक्त काही वाचतो का? आपल्याला कांदबरी कविता संग्रह व निरनिराळी पुस्तके वाचण्याचा छंद पाहिजे. त्यांनी वेगळ्या कांदबरांची अनुभवे सांगितली. नंतर ते म्हणाले आपल्याला भाषेवरही लक्ष द्यावे लागेल. आपल्यातुन आगरी भाषा बोलणारे किती आहेत. भरपुर जणांनी हात वरती केला त्यांना सरांनी आव्हान केले की तुम्ही एक छोटासा प्रयत्न करा की आगरीतही पुस्तके छापुन आली पाहिजे. तिचेही संवर्धन झाले पाहिजे. त्यातील गोडवा तसाच टिकून राहिला पाहिजे.

त्यांच्या वाचन हे किती असेल हे त्यांचा भाषेचा स्पष्टीकरणातुन दिसत होते. हे व्याख्यान कॉलेजमधील ५००० विद्यार्थ्यांपैकी आम्ही १०० विद्यार्थ्यांचा नशिबात होते.

संध्याकाळी काही विद्यार्थ्यांनी बाहेर गावांत फिरुन येण्याचा निर्णय घेतला. त्यात आमचाही सहभाग होता.परवानगी भेटताच आम्ही गावाचा दिशेने निघालो. गावांत तसी फारसी वस्ती नव्हती. कदाचित ओसाड गावच असावे.

एक मुख्य रस्ता आणि एकदाच येणारी बस याशिवाय गावांकडे सरकारकडुन भेटलेले काहीच नव्हते. गावात मोबाईलची रेंज कुठेच नव्हती. गावात इथे तिथे फिरुन फोटो काढुन झाल्यावर आम्ही परत एकदा आश्रमशाळेत आलो. आश्रमशाळेत आज भजनाचा कार्यक्रम होणार होता.

रात्रीचे जेवण संपले. आता वेळ होती भजनाची. याचे आयोजन मा. प्राचार्य फपाळे सरांनी केले होते. मुलांचे चेहरे आज झोपण्यासारखे वाटत होते. कोणीही किर्तन ऐकण्याचा परिस्थीतीत नव्हता. तरीही आम्हाला तासभर तरी बसावे लागले.

उद्याचा दिवस आमच्या दृष्टीने महत्त्वाचा होता. उद्या आम्हाला फक्त किचन संबंधीचे काम करायचे होते. सकाळचा नाश्ता आठचा आत दुपारचे जेवण एक चा आत आणि रात्रीचे जेवण ८ चा आत हे करायचे होते. १०० मुलांचे जेवण आणि दोन वेळेचा चहा अशी कामे उद्याची होती. दिसायला सोपी पण करतांना नकोसी वाटणारी ही कामे होती. तसेही प्रत्येक ग्रुपमध्ये मुलींची नेमणुक केलीच होती. पण हे काम सगळ्यांना मिळुन करायचे होते.

★★★

पाचवा दिवस २८/१२/२०१३

आज आमच्या ग्रुपला फक्त किचनची कामे करायची होती. पहाटे ५ च्या सुमरास आमचा ग्रुप उठुन अंघोळ करुन तयार झाला. सकाळी निहारीत पोहे बनणार होते. शंभरपेक्षा जास्त लोकांचा नाश्ता आमच्या द्वारे बनणार होता. आतापर्यंत घरी कधी एवढी मदत केली नव्हती जेवढी इथे करावी लागली. कांदा कापण्यापासुन ते पाणी भरण्यापर्यंत सर्व कामे करावी लागली. यातुनच आईची जेवणातील मेहनत कळली. आजच्या आमच्यावर दिनचर्या लागु झाली नाही. आजच्या दिवस फक्त किचन साठीच होता. हे सर्व काम मी प्रथमच करत होतो. आमच्या ग्रुपमध्ये सर्वांत कमी किचनशी जोडलेलो मीच होतो. पाणी भरणे आणि भांडी घासणे हे मला दिलेले काम होते. दुपारच्या जेवण्याची तयारी चालु होती. काही ग्रुपमधील विद्यार्थी एक विद्यार्थ्यांला सारखे सारखे चिडवत होते. पुर्ण ग्रुप किचन मध्ये असतांना सगळ्यांचा या कृतीला पाहुन मी ही त्यात सहभागी झालो आणि शायरीने सगळ्यांचे लक्ष वेधत मी म्हणालो.

“मुस्कुराना तो हर खुबसुरत लडकी की अदा है

मुस्कुराना तो हर खुबसुरत लडकी की अदा है

मेरे भाई जो उसे प्यार समझे वो सबसे बडा गधा है।”

सगळेच जण जोरजोरात हसत होते आणि त्या मुलांकडे एकटक पाहत होते. नंतर तो मुलगा म्हणाला “क्या यार स्वप्नील तुभी...”

दुपारच्या जेवण्याची तयारी झाली होती. आता वेळ होती वाढण्याची पहिले सर्व ग्रुप जेवतील त्यानंतरच आम्ही जेवणार हा नियमच होता. समोर भलीमोठी लाईन दिसत होती. काही विद्यार्थ्यांची संख्या वाढली होती. जेवण करतांना आम्हाला जाणवले की जेवण कमी पडण्याची शक्यता आहे. पण कुठेही त्याची भीती न ठेवता आम्हाला वाढण्याची आदेश आमच्या सिनियर विद्यार्थ्यांनी दिला होता. संगळ्यांचे जेवण संपले भाजीत फक्त तेल थोड्यासा रस्सा उरला होता. मी व आमच्या ग्रुपने त्याा सोबतच दुपारचे जेवण केले.

दुपारच्या जेवण्याची भांडी घासुन झाल्यानंतर आम्ही थोडा आराम केला. दुपारचा पाच सुमऱ्यास चहा बनवला. त्याचे ही वितरण आम्हाला करायचे होते. रात्रीच्या जेवण्याची तयारी सुरु झाली. आम्हाला आठच्या आत रात्रीचे जेवण तयार करायचे होते. भात आणि चपात्या आणि मिक्स भाजी असे जेवण बनवायचे होते. तर त्यासोबत वाढणाऱ्या इतर वस्तुचीही तयारी करायची होती.हे सर्व करत असतांना शरीर थकुन गेले पण आम्ही मात्र प्रत्येक गोष्ट अनुभवत होतो.

★★★

सहावा दिवस २९/१२/२०१३

सहावा दिवस हा किचन पाळी दुसऱ्या ग्रुपवर घेऊन येणारा होता. तर आमचा परत एकदा रोजच्या दिनचर्येत सहभाग झाला. आज सकाळी उठल्यानतरं तोच क्रम म्हणजे व्यायाम, श्रमदान आणि दुपारचे जेवण झाल्यावर वेळ होती व्याख्यांनाची. आज व्याख्यानाचा विषय हा नोकरी विषय माहिती किंवा सल्ला विषयी होता.

या व्याख्यानात आम्हाला गजानन सरांकडुन सरकारी व खाजगी कंपनीत खाली असलेला पण चांगल्या अशा दुलर्क्षित नोकऱ्यांची माहिती करुन दिली. काही संकेत स्थळांचीपण माहिती दिली.

व्याख्यान संपल्यावर आम्ही रात्री सादर करण्यात येणारा कार्यक्रमाबद्दल विचार विनिमय करत होतो. पण आज एक वेगळीच मनोरंज कार्यक्रम रंगणार होता. आजच्या कार्यक्रम मुलांचा वैयक्तीक कृतीवर होता. आज मुलांना गाने गाण्याचा किंवा शायरी बोलण्याची एक संधी आली होती. या संधीचा भरपूर वापर स्वयंमसेवकांनी केला. आजची इकडची ही शेवटची रात्र होती. यात प्रत्येकाने भाग घेतला कोणी गाने गाऊन दाखविले तर कोण विनोदी कविता सांगितल्या. प्रत्येक जणाचा सहभाग असतांना माझा ही सहभाग झाला. मित्रानो मी हनी सिंग चे दोन रॅप गीत गाऊन दाखवले . तर काही शायऱ्या देखील बोललो. आज कॅम्पतील मनोरंजणाचा शेवटचा भाग होता.

उद्या आम्ही दुपारी परळी आश्रम शाळा सोडून परत आपल्या घरी जाणार होतो. आता रात्रीचे दहा वाजले होते. काही मुल कोपऱ्यात जाऊन काहीतरी आपआपसात बोलत होते.

आम्ही झोपण्याचा तयारीत होतो. पण त्या मुलांचा विचार काही वेगळाच होता. रात्रीची वेळ होती सर्व मुले रुमच्या दिशेने निघाले.मुले रुममध्ये जाताच सर निघुन गेले. थोड्यावेळानंतर लाईट बंद झाली. तासभर तरी कुठलाही गोंधळ झाला नाही. पण त्यानंतर त्या मुलांनी कोणालाही झोपून दिले नाही. कदाचित आम्ही रात्रीचे अडीच वाजेपर्यंत जागेच होतो. त्यानंतर हळु-हळु एक-एकाची झोपण्याची सुरुवात झाली. दुसऱ्यासाठी हा त्रास असला तरी स्वयंमसेवकांनी याचा पुर्ण आनंद घेतला.

★★★

सातवा दिवस ३०/१२/२०१३

आज वाटत होते कॅम्प कदाचीत १० दिवसांचा असता तर किती बरे झाले असते. घरापासुन जवळपास ५० ते ६० किलोमीटर दुर अशा गावांत आम्ही राहिलो. तेथील सामाजिक मुद्दाकडे लक्ष दिले. तेथील लोकांचे राहणीमान बघितले. खरच इथं आल्यापासुन कामाची शिस्त, दिलेल्या वेळेत कामपुर्ण करणे, आरोग्य टिकवणे, पुस्तका पलिकडचे ज्ञान प्राप्त करणे आणि त्याबरोबर एक बोलण्याचे व्यासपीठ असा भरपुर गोष्टी शिकायला भेटल्या. व्यासपीठवर बोलणे जरी सोपे वाटत असेल तरी तेवढे सोपे नाही. त्याचबरोबर एवढे चांगले मित्र भेटले. जे आपल्याच कॉलेजचा भाग होते पण कधी त्याच्याबद्दल कळले नव्हते. आज आम्ही १०० मित्र बनलो. कुठल्याही प्रकारचे नेट न वापरता. आज मी प्रत्येक सिनियर कॉलेजच्या विद्यार्थ्यांना सांगतो की कृपया एकदातरी आपल्या कॉलेजच्या आयुष्यात हा कॅम्प करुन बघा तुम्हाला खरच काही फरक जाणवेल. कदाचित आपल्या सवईत आपल्या विचारात किंवा समाजाविषयी असलेला भावनेत फरक नक्की पडेल.

★ समाप्ती ★